(<u>इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद</u>)

२०२३ एस.सी.सी(SCC) ऑनलाईन एस सी(SC) ३९७

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात
(न्यायमूर्ति अभय एस. ओक आणि न्यायमूर्ति राजेश बिंदल यांच्या समक्ष)

दिवाणी अपील क्र. ६८०१/२०१०

मूर्ती श्री दुर्गा भवानी (हेतुवाली) ट्रस्ट आणि इतर ..... अपीलकर्ते

-विरुद्ध-

दिवाण चंद (मृत) कायदेशीर वारसदारांच्या मार्फत आणि इतर.... उत्तरवादी

सह

दिवाणी अपील क्र. ६८०२/२०१०

दिवाणी अपील क्र. ६८० ३ /२०१०

दिवाणी अपील क्र. ६८०४ /२०१०

दिवाणी अपील क्र. ६८०१/२०१०, दिवाणी अपील क्र. ६८०२/२०१०, दिवाणी अपील क्र. ६८०३ /२०१० आणि दिवाणी अपील क्र. ६८०४ /२०१०, ११ एप्रिल २०२३ रोजी न्यायनिर्णित करण्यात आले.

या प्रकरणात उपस्थित राहिलेले अधिवक्ता:-

अपीलकर्त्यांकरीता - श्री. नीरज कुमार जैन, वरिष्ठ अधिवक्ता

श्री. राजिंदर माथूर ए. ओ. आर.(AOR)

श्री. एम. के. रवी, अधिवक्ता

श्रीमती. तनुज बग्गा शर्मा, अधिवक्ता

श्री. तरुण माथूर, अधिवक्ता

श्री. अक्षत सिंघल, अधिवक्ता

श्री. सिद्धार्थ जैन,

उत्तरवादींकरीता - श्री. ए. एन. अरोरा, ए. ओ. आर.(AOR)

श्री. संजय पारिख, वरिष्ठ अधिवक्ता

श्रीमती. सुश्री सृष्टि अग्निहोत्री, ए. ओ. आर.(AOR)

श्रीमती. संजना ग्रेस थॉमस, अधिवक्ता.

न्यायमूर्ति राजेश बिंदल द्वारा दिला गेलेला न्यायालयाचा निर्णय खालील प्रमाणे:- वादी या न्यायालयासमोर १९९७ च्या नियमित द्वितीय अपील क्रमांक २३०६ आणि २३०७ मध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाने व्यथित झाल्याने आला आहे , ज्या आदेशाने १९८९ च्या खटला क्रमांक २७३ आणि २७४ मधील न्यायचौकशी न्यायालयचे निर्णय आणि हुकूम मागे घेत खालच्या अपील न्यायालयचे निर्णय आणि हुकूम कायम ठेवले. अपीलकर्त्यांनी दाखल केलेली अपील फेटाळण्यात आली. उपरोक्त अपीलांच्या विरोधात २०१० च्या पुनर्विलोकन अर्ज क्र. आर ए-आर एस (RA-RS) २५ सी आणि २६-सी मध्ये पारित केलेल्या ५/०४/२०१० तारखेच्या आदेशांनाही आव्हान देण्यात आले आहे.

२. या प्रकरणाला चढ-उतारांचा इतिहास आहे. तथापि, सध्याच्या अपीलांकडे नेणारी तथ्ये ही दिवाणी अपील क्र. ६८०१/२०१० मधून लक्षात घेतली जात आहेत. तथापि, जेथे आवश्यक असेल तेथे, उक्त मालमत्तेशी संबंधित पूर्वीच्या खटल्याचा संदर्भ दिला जाईल.

३. अपीलकर्ता हा नोंदणीकृत धर्मादाय न्यास आहे, जो खसरा क्र. ४८३३ चा भाग असलेल्या जमिनीचा मालक आहे. अपीलकर्त्याने ताबा घेण्यासाठी २६.०५.१९८२ रोजी खटला दाखल केला होता ज्यात उत्तरवादींनी/प्रतिवादींनी जमिनीवर अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला होता. प्रतिवादींनी/उत्तरवादींनी असा दावा केला कि अपीलकर्ते/वादी हे वादग्रस्त मालमत्तेचे मालक नाहीत आणि खटला दाखल करण्याचा त्यांना कोणताही वैध अधिकार नाही; ३४ वर्षांहून अधिक काळ मालमत्ता प्रतिवादींच्या ताब्यात आहे आणि ते त्यांचा व्यवसाय चालवत आहेत; आणि दाव्यातील मालमत्ता ही खसरा क्र. ४८३३ चा भाग

नाही. प्रतिकूल कब्जा घेऊन ते दाव्याच्या मालमत्तेचे मालक झाले होते, अशीही विनंती करण्यात आली होती.

४. न्यायचौकशी न्यायालयाने २८.०२.१९९१ या तारखेच्या निकालाद्वारे हा खटला निकाली काढला. प्रतिवादींना /उत्तरवादींना खटल्याच्या मालमत्तेतून बाहेर काढण्याचे आदेश देण्यात आले. प्रतिवादींनी/उत्तरवादींनी दाखल केलेले अपील, विद्वान अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशांनी स्वीकारले. न्यायचौकशी न्यायालयाचा निर्णय आणि हुकूम प्रामुख्याने ते मालमत्तेवर आपला हक्क सिद्ध करण्यात अपयशी ठरले या कारणावरून बाजूला ठेवण्यात आला.

५. खालच्या अपील न्यायालयाचा निर्णय आणि हुकूम उच्च न्यायालयाने दिनांक १३.१०.२००९ च्या आदेशानुसार अपीलमध्ये कायम ठेवला होता आणि पुनर्विलोकन अर्ज देखील ०५.०४.२०१० रोजी फेटाळण्यात आला होता.

६. अपीलकर्त्यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील श्री. नीरज जैन यांनी सांगितले की, न्यायचौकशी न्यायालयाने पुराव्यांचे विवेचन करताना दाव्याचा योग्य निर्णय दिला आहे. तथापि, पुराव्यांचा चुकीचा अभ्यास केल्यावर, पहिल्या अपील न्यायालयाने ते निष्कर्ष प्रत्यावर्तित केले होते. उच्च न्यायालयानेही खालच्या अपील न्यायालयाचा निर्णय कायम राखण्यात चूक केली. त्यांनी पुढे सादर केले की न्यायचौकशी न्यायालया समोर, युक्तिवादादरम्यान, उत्तरवादींच्या/प्रतिवादींच्या वतीने हजर असलेल्या विद्वान वकिलांनी स्पष्टपणे कबूल केले होते की वादग्रस्त जागा खसरा क्रमांक ४८३३ चा भाग आहे. खरे तर, मालमत्तेच्या मालकीबाबत वाद नसेल तरच प्रतिकूल कब्जा दावा केला जाऊ शकतो. उच्च न्यायालयाने खसरा क्रमांक ४८३३ हा अपीलकर्त्यांचा असल्याचे स्पष्ट निष्कर्षही नोंदवले. तथापि, मालमत्तेची ओळख वादग्रस्त असल्याच्या कारणावरूनच अपीलकर्त्यांना दिलासा नाकारण्यात आला. उच्च न्यायालयाचे मत होते की ती खसरा क्रमांक ४८३३ चा भाग बनत नाही. खसरा क्रमांक ४८३३ हा अपीलकर्ते/फिर्यादी यांच्या मालकीचा आहे या उच्च न्यायालयाच्या निष्कर्षाला उत्तरवादींनी आव्हान दिलेले नाही.

७. त्यांनी पुढे सांगितले की, १९९० च्या रब्बीपासून खसरा गिरदावरीच्या दुरुस्तीसाठी उत्तरवादींनी ०२.०८.१९९३ रोजी तहसीलदार-सह-सहाय्यक जिल्हाधिकारी २ श्रेणी, कर्नाल यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. त्यामध्ये उत्तरवादींनी एक स्पष्ट कबुली दिली होती की उत्तरवादींच्या ताब्यात असलेले क्षेत्र खसरा क्रमांक ४८३३ चा भाग होते आणि ते त्यांच्या ताब्यात आहे, जे १९९४-१९९५ वर्षासाठी जमाबंदीवरून स्पष्ट होते. स्थानिक आयुक्तांचा अहवाल, १९८१ च्या दिवाणी खटला क्रमांक ३७१ या वेगळ्या खटल्यात सादर करण्यात आला होता (नि. १६), ज्यावर खालच्या अपील न्यायालयाने, कोणतेही पक्क्या खुणा निश्चित न करता विश्वास ठेवला. त्यांनी पुढे पेपर बुकच्या पृष्ठ ९७ वरील दस्तऐवजाचा संदर्भ दिला ज्यामध्ये उत्तरवादींनी वादग्रस्त मालमत्तेसाठी नगरपालिका समितीसमोर बांधकाम योजना सादर केल्याचा विशेषतः उल्लेख आहे की ती खसरा क्रमांक ४८३३ चा भाग आहे. वरील पुरावे अभिलेखावर असताना, मालमत्तेची ओळख वादग्रस्त असल्याचे खालच्या अपील न्यायालय तसेच उच्च न्यायालयाने नोंदवलेले निष्कर्ष पूर्णपणे विपर्यस्त आहेत, कारण उत्तरवादींनी हे स्वतः स्वीकारलेले होते की त्यांच्या ताब्यात असलेली मालमत्ता खसरा क्रमांक ४८३३ चा भाग होती.

८. असाही युक्तिवाद करण्यात आला की यापूर्वी सुंदर दास आणि गोपाल सिंग या उत्तरवादींनी भागवत सरूप, आनंद सरूप आणि (Pt) हर सरूप यांना कायमस्वरूपी रोखण्यासाठी कायम मनाई आदेशासाठी १९८१ चा दिवाणी खटला क्रमांक ३७१ दिनांक २९.०५.१९७५ रोजी दाखल केला होता, तसेच त्यांना दाव्याच्या मालमत्तेतून बेदखल करण्यापासून रोखले आणि प्रतिकूल कब्जा मिळवण्याचा अर्जही दाखल केला होता. जोपर्यंत प्रतिकूल कब्जा घेण्याच्या याचिकेचा संबंध आहे, ते निष्कर्ष विद्यमान उत्तरवादींच्या/त्यातील वादीच्या विरोधात होते, तर कायमस्वरुपी मनाई आदेशाचा हुकूम उत्तरवादींच्या दीर्घकाळ ताब्यात असल्यामुळे पारित करण्यात आला होता, ज्यामध्ये असे म्हटले होते की कायद्याच्या योग्य प्रक्रियेव्यतिरिक्त त्यांना बेदखल केले जाऊ शकत नाही. ते त्याच दाव्यातील मालमत्तेच्या संदर्भात होते. ३०.०९.१९८१ रोजी हा खटला अंशतः निकाली काढण्यात आला होता.

९. दुसरीकडे, उत्तरवादींची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील एस.एच(Sh.) संजय पारिख यांनी सांगितले की, या न्यायालयासमोर सर्व तथ्यात्मक मुद्दे मांडण्यासाठी अपीलकर्त्यांना खूप उशीर झाला आहे. खालील दोन्ही न्यायालयांनी उत्तरवादींच्या बाजूने तथ्यांचा समवर्ती निष्कर्ष नोंदवलेला आहे आणि तो निष्कर्ष खोडून काढण्यासाठी अभिलेखावर काहीही नाही. उत्तरवादींना विनाकारण खटल्यात ओढले जात आहे. आधीपासूनच अभिलेखीत असलेला, स्थानिक आयुक्तांचा दिनांक ०२.१२.१९७८ च्या अहवालात, स्पष्टपणे नमूद केले आहे की प्रतिवादींच्या ताब्यात असलेला परिसर खसरा क्रमांक ४८३३ चा भाग नाही, तर तो त्यापलीकडे ४३४ फूटावर आहे. या न्यायालयासमोर नवीन मुद्दे उपस्थित करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्याला परवानगी दिली जाऊ शकत नाही. उत्तरवादींच्या ताब्यात गेल्या ३४ वर्षांहून अधिक काळापासून मालमत्ता आहे. खरे तर, उच्च न्यायालयासमोरच्या अपीलातही कायद्याचा कोणताही वाद प्रश्न तयार करण्यात आला नव्हता आणि असा कोणताही कायदेशीर मुद्दा नाही, ज्यासाठी या न्यायालयाकडून निर्णय घेणे आवश्यक आहे.

१०. आम्ही पक्षकारांचे विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले आहे आणि अभिलेखावरील दाखल पुराव्यांचा अभ्यास केला.

११. अभिलेखावरील निकालांवरून हे स्पष्ट होते की हरसरूप -विरुद्ध- नगरपालिका समिती या प्रकरणातील अपीलकर्त्यांच्या हितासाठी उप-न्यायाधीश, कर्नाल यांनी पूर्वाधिकाऱ्यांच्या बाजूने दिनांक ३०.०७.१९६५ चा निर्णय आणि हुकूम दिला होता. (१९६२ चा खटला क्रमांक २९२)

१२. अपीलकर्त्याने १९७४ साली विवादित मालमत्तेसाठी नगरपालिका समितीच्या विरोधात उपरोक्त हुकूमनामाच्या अंमलबजावणीसाठी याचिका दाखल केली. आदेशाच्या अंमलबजावणीत अडथळा आणत आणि त्यावर बांधकाम वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याने उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यांनाही अंमलबजावणी याचिकेत उत्तरवादी म्हणून समाविष्ट करण्यात आले होते.

१३. उपरोक्त अंमलबजावणीच्या कार्यवाहीत स्थानिक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली होती, ज्यांनी स्थळाला भेट दिल्यानंतर १९.१.१९७५ रोजी आपला अहवाल न्यायालयासमोर सादर केला होता. उत्तरवाद्यांनी बांधलेली दुकाने खसरा क्रमांक ४८३३ वर बांधलेली आहेत, असे त्यांनी अहवालात म्हटले होते. उपरोक्त अंमलबजावणीच्या कार्यवाहीच्या स्थितीबद्दल अभिलेखा मधून काहीही सूचित केले गेले नव्हते.

१४. खालच्या अपील न्यायालयाच्या दिनांक १६.०१.१९९७ रोजीच्या निकालात हे निदर्शनास आले होते की, उपरोक्त अंमलबजावणी याचिकेतील कार्यवाहीदरम्यान, उत्तरवादींना त्यांच्या पूर्वाधिकारिंनी दिलेल्या हमीपत्रावर बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली होती ज्यात असे म्हटले होते की जर ते हरले तर ते कोणत्याही नुकसानभरपाईचा दावा करणार नाहीत.

१५. उपरोक्त अंमलबजावणी याचिका प्रलंबित असताना, उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यांनी अपीलकर्ता ट्रस्टचे विश्वस्त भागवत सरूप यांच्याविरुद्ध खटला क्र. ३७१/१९८१ दाखल केला. या खटल्यात, दोन मुख्य वादप्रश्न निश्चित करण्यात आले होते, ते म्हणजे, त्यातील वादी प्रतिकूल कब्जा घेऊन मालमत्तेचे मालक झाले होते की नाही आणि दुसरे म्हणजे वादी १९६२ च्या खटला क्रमांक २९२, *हरसरूप -वि.- नगरपालिका समिती*, कर्नाल मधील आदेशाला बांधील आहेत की नाही. उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यांनी प्रतिकूल कब्जा घेण्याच्या आधारावर मालमत्तेच्या मालकीचा दावा करत खटला दाखल केला होता. ही केवळ वस्तुस्थिती, दाव्याच्या मालमत्तेवरील अपीलकर्त्यांची मालकी स्वीकारली गेली होती असे पूर्व-गृहीत धरते. कोणत्याही परिस्थितीत, प्रतिकूल कब्जा घेऊन विवादात असलेल्या मालमत्तेचा मालक बनलेल्या उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यां संबंधीचा मुद्दा त्यात वादीविरुद्ध ठरवला गेला. वर नमूद केलेल्या खटल्यातील वादी त्यांचा प्रतिकूल ताबा सिद्ध करण्यात अपयशी ठरले होते, असे विशेषतः म्हटले गेले. अखेरीस ३०.०९.१९८१ रोजी त्यातील वादी अंशतः यशस्वी झाले कारण त्यांच्या बाजूने केवळ कायमस्वरुपी मनाई आदेश जारी करण्यात आला होता, ज्याद्वारे त्यातील प्रतिवादींना कायद्याच्या योग्य प्रक्रियेव्यतिरिक्त त्यांच्या ताब्यात हस्तक्षेप करण्यापासून रोखण्यात आले होते. उपरोक्त खटल्यात सदर कानूनगो यांची स्थानिक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी उत्तरवादींच्या ताब्यात असलेली मालमत्ता नाल्या पासून ४३४ फूट दूर असल्याचे सांगून दिनांक ०२.१२.१९७८ ला आपला

अहवाल दिला होता. अहवालात खसरा क्रमांक ४८३३ चा उल्लेखही नव्हता. कुठल्याही पक्क्या खुणांचा उल्लेख नव्हता. ते शक्य तितके अस्पष्ट होते. या आदेशाला अंतिम रूप मिळाले.

<u>सद्याचे प्रकरण</u>

१६. ट्रस्टने ताबा मिळवण्यासाठी २६.०५.१९८२ रोजी १९८९ चा दिवाणी खटला क्रमांक २७३ दाखल केला. उत्तरवादींनी दाखल केलेल्या पूर्वीच्या खटला क्र. ३७१/१९८१ मध्ये सादर केलेल्या स्थानिक आयुक्तांच्या अहवालावर उत्तरवादींचा मुख्य विश्वास होता. २.१२.१९७८ या तारखेच्या स्थानिक आयुक्तांच्या अहवालाच्या अवलोकनाने असे दिसून येते की मोजमाप करण्यापूर्वी पक्क्या खुणा निश्चित केल्या नव्हत्या. उपरोल्लेखित अहवालात, जेथे कानूनगो स्थानिक आयुक्त होते, त्यात असा निष्कर्ष काढण्यात आला की वादग्रस्त मालमत्ता नाल्याच्या पलीकडे ४३४ फूट अंतरावर आहे. तसेच स्थळ आराखडा देखील अहवालासोबत जोडण्यात आला होता, ज्यामध्ये रस्ता आणि नाला दाखवण्या व्यतिरिक्त मालमत्ता योग्यरित्या ओळखण्यासाठी कोणत्याही खसरा क्रमांकाचा उल्लेख नव्हता. त्याच मालमत्तेशी संबंधित १९.१.१९७५ रोजीच्या स्थानिक आयुक्तांचा अहवाल आधीच होता या वस्तुस्थितीचा संदर्भही देण्यात आला नव्हता. अपीलकर्त्याच्या पूर्वाधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या अंमलबजावणी कार्यवाहीमध्ये नियुक्त केलेल्या स्थानिक आयुक्तांनी दिलेला हा अहवाल होता, ज्यामध्ये उत्तरवादींचे पूर्वाधिकारी देखील पक्षकार होते. हा अहवाल आत्मविश्वास निर्माण करतो कारण मालमत्तेचे सीमांकन करण्यापूर्वी पक्क्या खुणा चिन्हांकित केल्या गेल्या होत्या आणि विशिष्ट खसरा क्र. ४८३३ मोजले गेले होते. उपरोल्लेखित अहवालासोबत योग्य आराखडा देखील जोडण्यात आला आहे.

१७. सध्याच्या खटल्यातील उत्तरवादींनी घेतलेली भूमिका अशी होती की त्या जागेचा ताबा त्यांच्याकडे गेल्या ३४ वर्षापासून आहे. दाव्याची मालमत्ता खसरा क्रमांक ४८३३ चा भाग नाही आणि तसेच ते प्रतिकूल कब्जा घेऊन मालमत्तेचे मालक झाले होते. अखेर याचिकाकर्त्यांच्या बाजूने खटला निकाली काढण्यात आला. निकालाच्या परिच्छेद १३ मध्ये, न्यायचौकशी न्यायालयाने उत्तरवादींची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलाने दिलेले विधान नोंदवले की दाव्याची मालमत्ता खसरा क्रमांक ४८३३ चा भाग आहे. तेच खाली लिहिले आहेः

"१३. युक्तिवादादरम्यान, श्री.टी. पी. एस. बेदी, वकील यांनी वादग्रस्त जागा खसरा क्रमांक ४८३३ चा भाग असल्याचे मान्य केले आहे. निःसंशयपणे, त्यांनी एका टप्प्यावर असा युक्तिवाद केला आहे की मालमत्तेची ओळख प्रस्थापित झालेली नाही, परंतु वादग्रस्त जागा खसरा क्रमांक ४८३३ चा भाग आहे हे त्यांनी मान्य केल्यामुळे ती खसरा क्रमांक ४८३३ मध्ये नाही याचा पुरावा पाहण्याची गरज नाही."

१८. प्रतिकूल कब्जा घेऊन मालमत्तेचे मालक होण्याबाबत त्यातील प्रतिवादींनी केलेल्या युक्तिवादाबाबत असे सांगता येईल की, आधीच्या खटल्याचा निष्कर्ष असा होता की उत्तरवादी केवळ त्या आधारावर आधीच हरले होते. (संदर्भ. खटला क्र. ३७१/१९८१). वरील दोन तथ्यांमुळे मालमत्तेची ओळख स्पष्टपणे सिद्ध झाली.

१९. आणखी एक वस्तुस्थिति जे स्पष्टपणे सिद्ध करते की वादग्रस्त मालमत्ता ही खसरा क्र. ४८३३ चा भाग असल्याचे येथे उत्तरवादींनी मान्य केलेली बाब होती, ती अशी की खसरा गिरदावरी मध्ये दुरुस्ती करण्यासाठी तहसीलदार-सह-सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्यासमोर २.८.१९९३ ला उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या अर्जावरून स्पष्ट होते, ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की अर्जदार १९५० पासून दुकानांचे मालक होते आणि तो खसरा क्र. ४८३३ चा भाग होता. सहायक जिल्हाधिकारी, द्वितीय श्रेणी, कर्नाल यांनी दिनांक १७.०२.१९९४ च्या आदेशाद्वारे खसरा गिरदावरीमध्ये दुरुस्तीचे निर्देश दिले, त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की यातील अर्जदार/उत्तरवादींचे पूर्वाधिकाऱ्यांच्या ताब्यात खसरा क्रमांक ४८३३ चा भाग होता.

२०. २८.०२.१९९१ रोजीच्या न्यायचौकशी न्यायालयाच्या निकाल आणि हुकूमनाम्याने व्यथित झाल्याने उत्तरवादींच्या पूर्वाधिकाऱ्यांनी अपील दाखल केले. विद्वान अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश यांनी १६.०१.१९९७ रोजी निकाल आणि आदेशाद्वारे याला परवानगी दिली होती. निकालाच्या परिच्छेद १४ मध्ये, १९६२ च्या खटला क्रमांक २९२ चा संदर्भ देताना, प्रथम अपील न्यायालयाने व्यक्त केलेले मत असे होते की अपीलकर्ते खसरा क्रमांक ४८३३ चे सह-मालक होते. तथापि, स्थानिक आयुक्तांच्या दिनांक ०२.१२.१९७८ च्या अहवालाच्या आधारावर, असे मत व्यक्त केले गेले की दाव्याची मालमत्ता वेगळी असल्याने आणि सध्याचे अपीलकर्ते त्याचे मालक नसल्यामुळे ते कुठलाही दिलासा मिळण्यासाठी पात्र नाहीत.

२१. अपीलकर्त्यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयासमोर नियमित द्वितीय अपील (आर.एस.ए.) RSA क्रमांक २३०६/१९९७ दाखल करून खालच्या अपील न्यायालयाच्या निर्णयाला आणि आदेशाला आव्हान दिले. अपील फेटाळणाऱ्या उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशातही, निर्विवादपणे, अपीलकर्ते हे खसरा क्रमांक ४८३३ चे मालक आहेत, असे विशेषतः नोंदवले गेले आहे. तरीही स्थानिक आयुक्तांच्या दिनांक ०२.१२.१९७८ अहवालाचा संदर्भ देत, अपीलकर्त्यांना कुठलाही दिलासा मिळण्यासाठी पात्र नसल्याचे ठरवण्यात आले. उपरोक्त निकालाविरुद्ध दाखल केलेला पुनर्विलोकन अर्जही फेटाळण्यात आला.

२२. सध्याच्या खटल्यातील अभिलेखीत तथ्यांवरून हे स्पष्ट होते की, अपीलकर्त्यांना खसरा क्र. ४८३३ या मालमत्तेचे मालक असल्याचे मान्य करण्यात आले आहे. उच्च न्यायालयाने दुसरे अपील फेटाळत दिलेल्या आक्षेपित आदेशातही हा निष्कर्ष नोंदवला गेला आहे. उत्तरवादींचे उच्च न्यायालयाने नोंदवलेल्या उपरोक्त निष्कर्षाला कोणतेही आव्हान नाही. खरे तर, ते करू शकले नाहीत कारण उत्तरवादींनी न्यायचौकशी न्यायालया समोरही त्या संदर्भात कबुली दिली होती.

२३. खसरा क्रमांक ४८३३ चा कोणताही भाग उत्तरवादींच्या ताब्यात नाही, कारण त्यांच्या ताब्यात असलेली मालमत्ता ही वेगळी आहे, हा एकमेव मुद्दा आहे ज्यावर अपीलकर्ते दाव्यात अपयशी ठरले. तथापि, त्या मुद्द्यावरही, खालच्या अपील न्यायालयाने तसेच उच्च न्यायालयाने नोंदवलेले निष्कर्ष, त्यांच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या ओळखीबाबत उत्तरवादींनी स्वतः केलेल्या कबुलीच्या स्वरूपात असलेल्या दोन पुराव्यांचा विचारा केला, तर ते अयोग्य आहेत. पहिले म्हणजे परिच्छेद क्र. १७ मध्ये निदर्शनास आल्याप्रमाणे, उत्तरवादींच्या वकिलाने न्यायचौकशी न्यायालया समोर केलेले विधान आणि दुसरे म्हणजे खसरा क्रमांक ४८३३ चा भाग आपल्या ताब्यात असल्याचे कबूल करून खसरा गिरदावरीमध्ये दुरुस्तीसाठी तहसीलदार-सह-सहाय्यक जिल्हाधिकारी यांच्यासमोर उत्तरवादींनी दाखल केलेला अर्ज. त्याव्यतिरिक्त, नायब तहसीलदारांनी सादर केलेला १९.१.१९७५ रोजीचा स्थानिक आयुक्तांचा अहवाल आहे. उप-न्यायाधीश, कर्नाल यांनी हरसरूप-विरुद्ध- नगरपालिका समिती या प्रकरणात त्यांच्या बाजूने पारित केलेल्या आदेशाच्या अपीलकर्त्यांच्या पूर्वाधिकार्यांनी दाखल केलेल्या अंमलबजावणी याचिकेत हेच होते. तरीही

प्रतिकूल कब्जा घेण्याविषयी उत्तरवादींच्या युक्तिवादवरून अपीलकर्त्यांच्या विशिष्ट मालमत्तेची मालकी पूर्व-गृहीत धरली जाते, जी उत्तरवादींच्या ताब्यात असल्याचा दावा केला जातो.

२४. वर नमूद केलेल्या कारणांमुळे, अपीलकर्त्यांनी दाखल केलेला पुनर्विलोकन अर्ज व अपील आणि खालच्या अपील न्यायालयाचे निर्णय आणि हुकूमनामे फेटाळणारा उच्च न्यायालयाने दिलेला आदेश कायदेशीररित्या कायम ठेवता येत नाही त्यामुळे ते रद्दबातल करण्यात येत आहे आणि अपील मंजूर करण्यात येत आहेत. न्यायचौकशी न्यायालयाने १९८९ च्या खटला क्रमांक २७३ आणि २७४ मध्ये पारित केलेले निर्णय आणि हुकूमनामा प्रत्यावर्तित करण्यात येत आहे.

२५. हुकूमनामा तयार करण्यात यावा.

<u>अस्वीकरण</u>

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरीता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबाजवणीकरीता वैध मानला जाईल."